www.esakal.com
सकाळ
नागपूर । बुधवार, ३१ मार्च २०१० । किंमत तीन रुपये

# विदर्भात उद्योग उभारावे : आमदार देशमुख

## विविध पदविका अभ्यासक्रमांचा दीक्षान्त समारोह; दोनशे ते दोन हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या उद्योजकांची उपस्थिती

वर्धा, ता. ३० : महाराष्ट्र म्हणजे केवळ मुंबई, पुणे नव्हे, तर विदर्भातही नवीन उद्योग उभारण्यास वाव आहे. त्याकरिता विदर्भ सक्षम आहे. उद्योजकांनी, नवउद्योजकांनी विदर्भाकडे लक्ष देऊन उद्योग उभारावे, असे प्रतिपादन आमदार सुरेश देशमुख यांनी केले.

मुंबई येथील लिबरेशन स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या वतीने लघु व मध्यम उद्योगाकरिता विविध पदविका अभ्यासक्रम चालविले जातात, या अभ्यासक्रमाच्या अकराव्या तुकडीचा दीक्षान्त समारोह पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला २०० ते दोन हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेले उद्योजक उपस्थित होते.

विदर्भ हा उद्योगाकरिता सर्वसंपन्न असा प्रदेश आहे. उद्योगाकरिता लागणाऱ्या वाहतुकीच्या सोयी, रेल्वेचे जाळे, हवाई मार्ग, तांत्रिक मनुष्यबळ, असे सर्व असताना उद्योजकांनी केवळ मुंबई, पुण्याचा विचार करू नये. त्या पलीकडे उद्योग विस्तीर्ण करण्याकरिता पाऊले टाकायला पाहिजेत. विदर्भातील काही जिल्ह्यात उद्योग नावालाही टाकीत नाही, अशा ठिकाणी उद्योजकांनी सर्व्हेक्षण करून उद्योग उभारले पाहिजेत. विदर्भात उद्योग नसल्याने बेकारी वाढते आहे. विदर्भातील तरुण हुशार आहे. त्यांच्या हाताला कामे मिळाली पाहिजे. याकरिता उद्योजकांनी विदर्भात यावे, असे आवाहन यावेळी आमदार सुरेश देशमुख यांनी केले.

> "बेरोजगारीने विदर्भातील अनेक पदवीप्राप्त युवक, युवती त्रस्त आहेत. त्यांनी प्राप्त केलेल्या पदवीची नोकरी विदर्भात नाही. त्यामुळे त्यांना अन्य ठिकाणी जावे लागते. विदर्भात उद्योगाची निर्मिती झाली तर, बेरोजगारांची समस्या सुटेल."
>
> – आमदार सुरेश देशमुख



वर्धा : पदविकाप्राप्त विद्यार्थ्यांसोबत आमदार सुरेश देशमुख उपस्थित उद्योजक.

लिबरेशन स्कूल ऑफ फॅमिली बिझनेस मॅनेजमेंटचे संचालक अमोल मुडे यांनी नव उद्योजकांना विदर्भात उद्योग उभारण्यास निश्चित प्रेरणा देऊ, असे सांगितले. कार्यक्रमाला नरेश स्टील समुहाचे सौरभ शहा, स्लॅकटॅकचे संजू शहा, बकारू शूजचे सावला, नीलेश पारेख, रजनीकांत गौलक्य, सिलफॅल्वसच्या सुवर्णालक्ष्मी अय्यर, लिबरेशन कोचेसच्या विजया लक्ष्मी सुवर्णा, तसेच लिबरेशन स्कूल ऑफ फॅमिली बिझनेस मॅनेजमेंटचे अधिकारी उपस्थित होते.